# Departmental Activity (Yearly folder) :

## Departmental Activity - मराठी विभाग - 2017-18

| Sr. No. | Date | Programme Title | Subject Title & Speaker | Participant Students | Participant Faculty | Outcomes |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 23/9/2017 | मराठी वांग्मय मंडळाचे उद्घाटन<br>Inauguration of Marathi Literary Association | उद्घाटक- पी. एस. वानखडे - बाळापुर<br>Inaugural – Prof. P.S. Wankhade - Balapur | 105 | 06 | विविध साहित्य प्रवाहांचा विद्यार्थ्यांना परिचय झाला. मराठीतील दर्जेदार वांग्मय आणि साहित्यिक यांची माहिती विद्यार्थ्यांना मिळाली.<br>Students were introduced to various literary streams.<br>The students got information about quality literature and literature in Marathi. |
| 2 | 20/11/2017 | विशेष भेट special visit | डॉ. गंगाधर पानतावणे अध्यक्ष - विश्व साहित्य मराठी संमेलनाचे | 95 | 10 | साहित्य संमेलनाचे आयोजन, नियोजन आणि उपयोजन याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.<br>Organizing planning and application of literary conference or guiding students |
| 3 | 13/1/2018 | मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा<br>( Marathi language conservation fortnight ) | उद्घाटक- डॉ. दिनकर उंबरकर | 107 | 06 | विद्यार्थ्यांना भाषेचे महत्व समजले<br>Students understood the importance of language |
| 4 | 27/2/2018 | - मराठी भाषा दिवस<br>( Marathi Language Day) | डॉ. अशोक इंगळे, बुलढाणा | 120 | 06 | मराठी भाषेविषयीचा अभिमान विद्यार्थ्यांमध्ये रुजला.<br>(Pride about Marathi language took root among the students.) |

## मराठी विभाग - सत्र 2017-18

**विद्यार्थ्यांची उपलब्धी :** लघुशोध प्रबंध विद्यापीठाला सादर

एम ए मराठी भाग 2 या अभ्यासक्रमाकरिता दोन विद्यार्थ्यांनी विद्यापीठाला लघुशोध प्रबंध सादर केला

1- कांचन वरोकार - विषय : नेमाडेच्या देखणी काव्यसंग्रहाचा वांग्मयीन अभ्यास.

2- संपदा शेलरकर - विषय : कोसला कादंबरीचे वांग्मय मूल्यमापन.

Student Achievement: Short research dissertation submitted to the University

Two students submitted their dissertation to the university for MA Marathi Part 2 course

1- Kanchan Warokar - Subject: Literary study of Nemade's beautiful collection of poetry.

2- Sampada Shelarkar - Subject: Literary Evaluation of Kosala Novel.

**शिक्षकांची उपलब्धी :**

1. 3/3/2018 - व्याख्यान- मराठी शुद्धलेखन विषयक नियम व लेखन - डॉ कैलास वानखडे

Lecture - Rules and Writings of Marathi Spelling - Dr. Kailas Wankhade

स्थळ - भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश महाविद्यालय पिंजर

Venue - Bhausaheb Lahane Jnanprakash Mahavidyalaya Pinjar

**आउटकम**

लेखन विषयक नियमानुसार वाचन करणे आणि लिहिणे याचे ज्ञान विद्यार्थ्यांना अवगत झाले.

चुकीचे लेखन आणि चुकीचे वाचन झाल्यास परिणाम कसे गंभीर होतात याविषयी जागृती झाले.

Outcome

The students became aware of the knowledge of reading and writing according to the writing rules.

There was an awareness of how serious the consequences can be if miswriting and misreading occur.

शोधनिबंध - 07 - डॉ. कैलास वानखेडे यांचे वेगवेगळ्या जर्नल्समध्ये एकूण सात शोधनिबंध प्रकाशित झाले

02 - प्रा भास्कर धारणे यांचे वेगवेगळ्या जर्नल्समध्ये एकूण दोन शोधनिबंध प्रकाशित झाले

03 - डॉ एच एन नरेटी यांचे वेगवेगळ्या जर्नल्समध्ये एकूण तीन शोधनिबंध प्रकाशित झाले

Research Paper - 07 - total of seven research papers by Dr. Kailash Wankhede were published in various journals.

02 - total of two research papers by Prof. Bhaskar Dharane were published in different journals.

03 - total of three research papers by Dr. H. N. Nareti were published in various journals.

---

# **2017-18 Departmental Extension activities** - Photos + News

20/11//2017 विश्व मराठी संमेलनाध्यक्ष,डॉ.गंगाधर पानतावणे यांनी मराठी विभागाला भेट



31/1/2018 मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा - डॉ. दिनकर उंबरकर



• मंगळवार दि. १६ जानेवारी २०१८ मातृभूमि

## सीताबाई महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन कार्यक्रम संपन्न

अकोला दि. १५ :- सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा निमित्त मराठी भाषा संवर्धन दिनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थांनी मराठी विभागप्रमुख प्रा. बी. बी. धारणे होते. प्रमुख वक्ता म्हणून डॉ. डी. आर. खंडेराव लाभले तर डॉ. डी. ई. उंबरकर आणि प्रा. एस. आर. दामोदर यांची विशेष उपस्थिती होती. पमुख वक्ता डॉ. डी. आर. खंडेराव यांनी प्रतिपादन केले की, आजचा काळ बहुआयामी शाखेचा आहे त्यामुळे प्रत्येकाला बहुभाषीय असणे गरजेचे आहे. राष्ट्रीय अस्मिता आणि प्रादेशिक अस्मिता असणे दोन्हीही महत्वाचे आहे. पण आज प्रादेशिक अस्मिता हळुहळु लोप पावण्याच्या मार्गावर आहेत ही जाणीव लोकांमध्ये निर्माण झाल्यामुळे त्या विषयी लोक अधिक जागृत होत आहेत. मराठी भाषा ही प्रादेशिक अस्मितेतून राष्ट्रीय तसेच वैश्विक अस्मितेकडे मार्गक्रमण करीत आहे.

डॉ. डी. ई. उंबरकर यांनी मराठी भाषेविषयी मार्गदर्शन करतांना, जोपर्यंत आपण आपल्या मातृभाषेला आत्मसात करीत नाही तोपर्यंत जगातील कोणतीही भाषा आपण शिकू शकत नाही म्हणून मराठी भाषेचे महत्व अनन्यसाधारण आहे. आपण ज्या प्रांतामध्ये राहतो त्या प्रांताची भाषा अवगत असणे आवश्यक आहे. इंग्रजीचा प्रभाव मराठी भाषेवर होत आहेहे तर सत्य आहेच तो प्रभाव इतरही भाषेवर होतच आहे. अशा काळात आपल्या भाषेचे संवर्धन करणे आपले कर्तव्य आहे. मराठीचे संवर्धन व्हावे हाच मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा साजरा करण्यामागचा उद्देश आहे. आज सर्वत्र कॉन्व्हेंट संस्कृती विकसित होत आहे. तेथे संमिश्र भाषेचा प्रभाव मराठीवरही झालेला दिसतो. या मुलांना मातृभाषा उत्तम येणे गरजेचे आहे, असे विचार व्यक्त केले.

प्रा. एस. आर. दामोदर हे राज्यशास्त्राचे गाढे अभ्यासक तथा तत्वचिंतक आहेत यांनी इतिहासकालीन भाषिक विचारवंताच्या कार्याला उजाळा दिला. पूर्वीचे मराठी विचारवंत इंग्रजी भाषा शिकले आणि इंग्रजी मधील ज्ञान त्यांनी मराठीमधून समाजापर्यंत पोहोचविले त्यामुळे त्या काळात दोन्ही भाषांचे संवर्धन झाले आहे. त्यामुळे आजही त्याच कृतीची मराठी भाषेला गरज आहे. आज मात्र शिकलेल्या लोकांच्या वापरातून मराठी भाषा दुर्लक्षित होतांना दिसते असे विचार आपल्या भाषणातून प्रकट केले.अध्यक्षीय समारोपा मधून प्रा. बी. बी. धारणे यांनी मराठीचा ज्ञानभाषा म्हणून गुण गौरव केला. आजच्या स्पर्धात्मक युगामध्ये ज्ञान आत्मसात करण्यासाठी आणि स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी मातृभाषा हीच आधार ठरु शकते. कारण कोणतेही ज्ञान आत्मसात करण्यासाठी मातृभूषा उत्तम येणे आवश्यक असते, असे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन मनिषा नागरे यांनी केले, प्रास्ताविक प्रा. हरिचंद नरेटी तर आभार प्रदर्शन प्रा. कैलास वानखडे यांनी मानले. कार्यक्रमासाठी प्रा. बी. एस. डोंगरे, प्रा. उज्वला डांगे यांच्यासह मराठी विभागातील विद्यार्थी उपस्थित होते.

27/2/2018 ‘मराठी भाषा दिवस’ - डाॅ. अशोक इंगळे



29/3/2018 ‘सृजन’ या भितिपत्रका - डाॅ. अशोक सोनोने



# Departmental Activity - मराठी विभाग - 2018-19

| Sr. No. | Date | Programme Title | Subject Title & Speaker | Participant Students | Participant Faculty | Outcomes |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 7/12/2018 | मराठी वांग्मय मंडळाचे उद्घाटन<br>Inauguration of Marathi Literary Association | उद्घाटक- श्री युवराज पाटील माहिती अधिकारी अकोला<br>Inaugural - Shri Yuvraj Patil Information Officer Akola | 103 | 07 | कथा वांग्मयाची माहिती प्राप्त झाली आणि त्यात रुची निर्माण झाली.<br>वांग्मयाचा प्रत्येक प्रकारांमध्ये एक कथा दडलेली असते याचा परिचय झाला.<br>The story gained information and interest in Wangmaya.<br>It was introduced that there was a story hidden in each type of Wangmaya. |
| 2 | 4/1/2019 | ग्रंथालय भेट | मार्गदर्शक: ग्रंथपाल डॉ. अशोक सोनवणे | | | ग्रंथालयात असलेल्या विविध ग्रंथांचा परिचय विद्यार्थ्यांना करून दिला<br>Introduced the students to the various books available in the library |
| 3 | 27/2/2019 | मराठी भाषा दिवस<br>( Marathi Language Day) | वक्ते: प्रा. दिवाकर सदाशिव, दहीहंडा<br>Speaker - Prof. Diwakar Sadanshio Dahi Handa | 125 | 06 | मराठी भाषेच्या समृद्धीची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये रुजली<br>संदेशवहनाची सर्व शक्ती मराठी भाषेत घडलेली आहे हे विद्यार्थ्यांनी समजून घेतले<br>Awareness of the richness of Marathi language took root among the students.<br>The students understood that all the power of communication is in Marathi language. |

## मराठी विभाग - सत्र 2018-19

3. **विद्यार्थ्यांची उपलब्धी**

11/9/2018 विद्यापीठ स्तरीय काव्यस्पर्धा - कवी **केशवसुत काव्यस्पर्धा** या स्पर्धेमध्ये दोन विद्यार्थी सहभागी झाले
तुषार भाऊराव राऊत -बीए भाग 1
सोपान नारायण जन**क**- एम ए मराठी भाग 1

3. Student achievement
11/9/2018 University Level Poetry Competition ( Poet Keshavsut Poetry Competition)
Two students participated in this competition
Tushar Baburao Raut BA part 1
Sopan Narayan Jhanak M A Marathi part 1

**शिक्षकांची उपलब्धी :**

21/7/2018 डॉ. कैलास वानखडे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथील
पीएच.डी. ही पदवी प्राप्त झाली विषय दलित साहित्याची निर्मिती प्रक्रिया
डॉ. कैलास वानखडे यांचे विविध शोध पत्रिकेमध्ये तीन शोध निबंध प्रकाशित झाले

Teacher Achievement:
21/7/2018 Dr. Kailash Wankhade awarded Ph.D Degree, by Babasaheb Ambedkar Marathwada University
Aurangabad - subject - Production process of Dalit literature
Dr. Kailash Wankhede has published three research papers in various research journals

31/10//2018 डॉ. हरिश्चंद नरेटी यांना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती येथील आचार्य पदवी प्राप्त झाले
विषय पूर्व विदर्भातील गोंडी बोलीचा भाषाशास्त्रीय अभ्यास
डॉ. हरिश्चंद नरेटी यांची **तीन शोधनिबंध** प्रकाशित झाले

31/10/2018 Dr. Harichand Nareti received the title of Ph.D from
Sant Gadge Baba Amravati University, Amravati
Subject Linguistic study of Gondi dialect in East Vidarbha
Three research papers by Dr Harichand Nareti were published
मराठी प्राध्यापक परिषदेमध्ये विभागातील डॉ. कैलास वानखडे, डॉ. हरिचंद नरेटी, प्रा. भास्कर धारणे यांनी
सक्रिय सहभाग घेतला
मराठी **विभाग** प्रमुख प्राध्यापक भास्कर धारणे यांचे **दोन शोधनिबंध** प्रकाशित झाले
डॉ. कैलास वानखडे यांचे **तीन शोधनिबंध** प्रकाशित झाले
Workshop on 'Marathi lekhanvishyak niyam' Bhausaheb Lahane College, Pinnjar
Took an active part In the Marathi Professors' Council,by Dr. Kailash Wankhade, Dr. Haricha nd Nareti
Prof. Bhaskar Dharane
Two research papers of Professor Bhaskar Dharane were published
Three research papers by Dr. Kailas Wankhade were published
Workshop on 'Marathi lekhanvishyak niyam' at Bhausaheb Lahane College, Pinjar

---

# **Departmental Extension activities** - Photos + News

2018-19

24/8//2018 मराठी वाड्मय मंडळ उद्घाटन . श्री युवराज पाटील, जिल्हा माहिती अधिकारी



4/1/2019 ग्रंथालय भेट - माहिती देताना ग्रंथपाल डॉ. अशोक सोनोने



27/2/2019 मराठी भाषा दिन - कथाकार प्रा. दिवाकर सदांशिव

रविवार, दि. ३ मार्च २०१९
epaper.-deshonnati.com
२
देशोन्नती

# सीताबाई महाविद्यालयात मराठी भाषा दिन



**प्रतिनिधी/२ मार्च**

**अकोला :** स्थानिक सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला मराठी वाङ्मय मंडळद्वारा आयोजित महाविद्यालयात कुसुमाग्रज उर्फ वि.वा. शिरवाडकर यांच्या जन्मदिनानिमित्त मराठी भाषा दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मराठी विभागप्रमुख प्रा.बी.बी. धारणे होते तर कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून सुप्रसिद्ध कथाकार प्रा. दिवाकर सदांशिव लाभले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सुत्रसंचलन डॉ. कैलास वानखडे यांनी केले. आपल्या प्रास्ताविकातून मराठी वाङमय मंडळाच्या आजपर्यंत आयोजन होत असलेल्या उपक्रमांविषयी थोडक्यात आढावा घेतला. कार्यक्रमाला लाभलेले प्रमुख वक्ते प्रा. दिवाकर सदांशिव यांनी भाषेचे महत्त्व विषद करताना मराठी भाषा ही कशी सकस आहे. जीवनाच्या उर्जेसाठी जसा व्यायाम महत्त्वाचा तसेच भाषाभिवृद्धीसाठी भाषेतील कौशल्य आपल्या व्यक्तीमत्त्वातून साकार झाले पाहिजे असे विचार त्यांनी यावेळी मांडले. अध्यक्षीय भाषणातून प्रा.बी.बी. धारणे यांनी भाषेचे सांस्कृतिक, शैक्षणिक आणि व्यावहारीक महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाचे आभार प्रा. डॉ. हरीचंद्र नरेटी यांनी मानले. या कार्यकमास विविध विषयांचे प्राध्यापक तसेच बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

मातृभूमि रविवार दि. ३ मार्च २०१९

# सीताबाई महाविद्यालयात मराठी भाषा दिवस साजरा

अकोला दि. २ :- सिताबाई कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अकोला येथे मराठी वाङमय मंडळाच्या वतीने कुसुमाग्रज वि. वा. शिरवाडकर यांचा जन्मदिवस मराठी भाषा दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मराठी विभाग प्रमुख बी. बी. धारणे यांची उपस्थिती होती तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा. दिवाकर सदांशिव यांची उपस्थिती होती. आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रा. धारणे यांनी मराठी भाषेचे सांस्कृतिक, शैक्षणिक व व्यावहारिक महत्व विशद केले तर प्रा. सदांशिव यांनी मराठी भाषेची व्याप्ती, सांगितली जीवनाच्या उर्जेसाठी जसा व्यायाम आवश्यक आहे तसेच भाषा अभिवृध्दीसाठी भाषेतील कौशल्य आपल्या व्यक्तीमत्वातून साकार झाले पाहीजे असा विचार व्यक्त केला. कार्यक्रमाचे संचालन व प्रास्ताविक डॉ. कैलास वानखडे यांनी केले त्यांनी आपल्या प्रास्ताविकात मराठी वाङमय मंडळाच्या उपक्रमा बाबत सांगितले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. डॉ. हरिचंद नरेटी यांनी केले. कार्यक्रमास प्राध्यापक वृंद व विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# Departmental Activity - मराठी विभाग - 2019-20

| Sr. No. | Date | Programme Title | Subject Title & Speaker | Participant Students | Participant Faculty | Outcomes |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 19/1//2020 | शैक्षणिक सहल<br>Educational Trip | वेरूळ, दौलताबाद, औरंगाबाद<br>Ellora, Daulatabad, Aurangabad | 54 | 02 | अभ्यासक्रमाच्या ग्रंथांमध्ये येणारे ऐतिहासिक स्थळांचे उल्लेख विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभवले.<br>The students actually experienced the mention of historical places in the textbooks |
| 2 | 27/2/2020 | **मराठी भाषा गौरव दिन**<br>Marathi Language Pride Day | योगदान वक्ते डॉ. रावसाहेब काळे<br>Speaker Dr. Raosaheb Kale | 117 | 05 | मराठी भाषा ही इंडो-युरोपीय भाषाकुलातील एक समृद्ध भाषा आहे हे विद्यार्थ्यांना समजले<br>The students understood that Marathi is a rich language in the Indo-European language family |
| 3 | 12/3/2020 | ॲडॉन कोर्सचा समारोप | **प्रमुख पाहुणे : डॉ. अशोक सोनवणे प्रा. एस आर दामोदर**<br>Chief Guest: Dr. Ashok Sonone<br>prof. S R Damodar | 176 | 07 | मराठीच्या व्यावहारिक रूपाचे विविध घटक विद्यार्थ्यांनी समजून घेतले<br>The students understood various aspects of the practical form of Marathi |
| 4 | 16/3/2020 | व्याख्यान<br>Lecture | विषय - लोकसाहित्याचे मराठी साहित्याला योगदान वक्ते डॉ. रावसाहेब काळे - लोणी<br>Subject - Contribution of Folklore to Marathi Literature<br>Speaker Dr. Raosaheb Kale - Loni | 102 | 05 | मराठी साहित्य हे लोकसाहित्य मधूनच निर्माण झाले हा विचार उलगडला. लिखित वांग्मयाच्या मुळाशी मौखिक वांग्मय असल्याचे उलगडले<br>The idea that Marathi literature originated from folklore was revealed. It turned out to be oral literature at the root of written literature. |
| 5 | 2019-20 | प्रकल्प<br>Project<br>(MOU ) | लोकसाहित्य : म्हणी आणि उखाणे<br>संकलन-संपादन : एम. ए मराठी भाग 1 व 2 चे विद्यार्थी आणि संस्था.<br>Folklore: Sayings and Riddles<br>Editing: Students of M. A Marathi Part 1 & 2.<br>and Institution | 16 | 05 | लोकसाहित्याचे संकलन अन्न व संशोधन कसे करावे याविषयीचे ज्ञान विद्यार्थ्यांना अवगत झाले.<br>लोकसाहित्य मध्ये विद्यार्थ्यांची रुची वाढली.<br>The students became aware of how to compile folklore, food and research. Students' interest in folklore increased. |

## मराठी विभाग - सत्र 2019-20

**विद्यार्थ्यांची उपलब्धी:**

एम ए मराठी भाग 2 ची विद्यार्थिनी वैशाली विनायकराव पांडे ही उन्हाळी 2019 या परीक्षेमध्ये विद्यापीठातून तिसरी मेरिट आली

Student Achievement : Exam Summer 2019

Vaishali Vinayakrao Pandey, a student of MA Marathi Part 2 is the **third merit** from the university in the summer 2019 exam

**शिक्षकांची उपलब्धी :**

**MRP - Subbmit** by Dr. Kailash Wankhede - 2 Lakh - Jyotirav Fule Likhit Gulamgiri Ya Granthatil Mulyadarshan

डॉ. कैलास वानखेडे यांची **प्राध्यापक** पदाची स्थाननिश्चिती झाली

डॉ. कैलास वानखडे यांचे **चार शोधनिबंध** प्रकाशित झाले.

डॉ. कैलास वानखडे यांना **पी.एचडी चे मार्गदर्शक** म्हणून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाची मान्यता मिळाली.

Teacher Achievement:


MRP - Submited by Dr. Kailash Wankhede - 2 Lakh - jyotirav fule likhit Gulamgiri ya Granthatil Mulyadarshan
Dr. Kailash Wankhede was appointed as the Professor
Four research papers published by Kailash Wankhade.
Dr. Kailash Wankhade has been recognized by Sant Gadge Baba Amravati University as Ph.D Supervisor by SGBAU

---

# **Departmental Extension activities** - Photos + News

2019-20

19/1/2020 शैक्षणिक सहल औरंगाबाद, वेरूळ






27/2/2020 मराठी भाषा दिवस - लोकसाहित्याचे अभ्यासक डाॅ. रावसाहेब काळे

३ मातृभूमि www.ematrubhumi.in महानगर सिटी न्यूज रविवार, १ मार्च २०२०

## सीताबाई महाविद्यालयात मराठी भाषा दिन साजरा

। अकोला दि. २९



सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला येथे, मा प्राचार्य डॉ. आर. डी. सिकची यांच्या मार्गदर्शनात, मराठी भाषा दिवस हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी विभागाचे प्रमुख प्रा भास्कर धारणे होते तर प्रमुख वक्ते म्हणून वऱ्हाडी भाषेचे अभ्यासक आणि लेखक डॉ रावसाहेब काळे हे होते. भाषेचे महत्व सांगताना ते म्हणाले की भाषा ही केवळ शब्दांची नसते तर त्यामागे प्रदीर्घ अशी संस्कृती असते. जगातील कोणतीही भाषा शिकायची असेल किंवा कोणतेही ज्ञान आत्मसात करायचे असेल तर आपली मातृभाषा समुळपणे शिकणे आवश्यक असते. शेतीशी निगडित असलेल्या संस्कृती विषयी बोलताना ते म्हणाले की जोपर्यंत भाषा जिवंत आहे तोपर्यंत संस्कृती जिवंत आहे. शेतीशी निगडितअसलेले शब्द पीके, मशागत, वखर, नांगर, तिफण, कडबा, कुट्टी, कुटार, चारा, बैल, शेण, गवरी, ऊळवा, सार्वन, कुळ असे अनेक शब्द हे केवळ शब्द नसून त्यामागे संस्कृती असते. गाय, बैल, असे शब्द उच्चारताच त्यामागची संस्कृती आपल्यासमोर उभी होते. अध्यक्षीय भाषणातून प्रा धारणे यांनी मराठी भाषेचा विकास करणे हे त्या भाषकावरच अवलूंबून आहे. आज हिंदी आणि इंग्रजी या भाषा तर महत्वाच्या आहेतच त्या सोबत आपली मातृभाषा असलेली मराठी ही भाषा फारच महत्वाची आहे, असे विधान केले. कार्यक्रमाचे संचालन मनोज भगत यांनी केले, परिचय चित्र खडसे यांनी दिला, तर आभार अश्विनी वानखडे या विद्यार्थिनीने मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ कैलास वानखडे, डॉ हरिचंद नरेटी यांनी परिश्रम घेतले. डॉ सविता रेखे, प्रा उमा पाटील, प्रा श्रीराम काळे, प्रा मोनाली पाटील, प्रा उज्वला डांगे, प्रा सुभाष दामोदर, प्रा सुनीता डाबेराव, प्रा भगत यांच्यासह मराठी विषयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

11/3/2020 प्रशिक्षण वर्गाचा समारोप व प्रमाणपत्र वितरण - प्रा. सुभाष दामोदर

मातृभूमि www.ematrubhumi.in महानगर सिटी न्यूज गुरुवार, १२ मार्च २०२०

## सीताबाईमध्ये व्यावहारिक मराठी प्रशिक्षण वर्गाचा समारोप

। अकोला दि. ११ ।



सीताबाई कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अकोला येथे मराठी विभागाच्या वतीने व्यावहारिक मराठीचा तीस तासिकेचा प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला. या प्रशिक्षण वर्गामध्ये व्यावहारिक मराठीचे विविध घटक शिकविले. मराठी भाषेचा व्यवहारामध्ये उपयोग कसा करावा, मराठी भाषकाला नोकरीच्या संधी कोठे कोठे आहेत, त्या अनुषंगाने लेखन विषयक नियम, मुद्रित शोधन, भाषांतर, शोधनिबंध, सूत्र संचालन, वक्तृत्व कला, जाहिरात लेखन, संपादन, स्व परिचय पत्र, नोकरीसाठी अर्ज ई. घटकांचे प्रशिक्षण याद्वारा दिल्या गेले. या प्रशिक्षण वर्गाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आज प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून ग्रंथपाल डॉ अशोक सोनोने आणि प्रा सुभाष दामोदर हे लाभले होते. विद्यापीठीय अभ्यासक्रमाव्यतिरिक्त असे प्रशिक्षण दिले गेले पाहिजे. अशा प्रशिक्षणाने आपले व्यावहारिक ज्ञान विकसित तर होतेच शिवाय आपला आत्मविश्वास दृढ होतो असे मार्गदर्शन डॉ सोनोने यांनी केले. प्रा सुभाष दामोदर यांनी मार्गदर्शन करतांना असे प्रतिपादन केले की, आज विद्यार्थी पदवीधर होतो पण त्याला व्यवहाराचे ज्ञान पाहिजे तेवढे नसते त्यामुळे एखादे काम करतांना तो धाडसाने वागत नाही. अशा कोर्स ने विद्यार्थी तयार होतील. आज अशा कोर्सची फार गरज आहे. व्यवहारापासून दूर असलेल्या विद्यार्थ्यांना मूलभूत ज्ञान देण्यासाठी व त्यांचा पाया मजबूत करण्यासाठी हे प्रशिक्षण घेतले पाहिजे असे अध्यक्षीय भाषणातून प्रा भास्कर धारणे यांनी उद्बोधन केले.

या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन डॉ कैलास वानखडे आणि विभागातील प्राध्यापक वृंदानी केले. डॉ हरिचंद नरेटी, डॉ सविता रेखे, प्रा श्रीराम काळे, प्रा उज्वला डांगे, प्रा उमा पाटील, प्रा मोनाली पाटील यांनी या कोर्ससाठी मोलाचे सहकार्य केले प्रमाणपत्राच्या वितरण समारंभाला विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठी विभाग : MOU कार्यक्रम : सत्र 2019-20

1. वऱ्हाडी बोलीतील म्हणींचे संकलन : संकलक - एम. ए. मराठीचे विद्यार्थी

2. व्याख्यान : विषय : लोकसाहित्याचे मराठी साहित्याला योगदान वक्ता : प्रा. डॉ. रावसाहेब काळे

मराठी विभाग, सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला आणि वऱ्हाड शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक बहुउद्देशीय संस्था, लोणी. यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व्याख्यान विषय : लोकसाहित्याचे मराठी साहित्याला योगदान

वक्ता : प्रा. डॉ. रावसाहेब काळे अध्यक्ष : कैलास वानखडे कार्यक्रम दिनांक 16 मार्च 2020

**Department of Marathi : MOU Program : Session 2019-20**

1. Collection of proverbs in Varhadi dialect : Compiler – M. A. Students of Marathi
2. Lecture : Topic : Contribution of Folk Literature to Marathi Literature Speaker : Prof. Dr. Raosaheb Kale

Department of Marathi, Sitabai College of Arts, Commerce and Science, Akola and Varhad Educational, Social and Cultural Multipurpose Institution, Loni. Lecture topic organized in association with: Contribution of Folk Literature to Marathi Literature
Speaker: Prof. Dr. Raosaheb Kale Chairperson : Dr Kailas Wankhade





**'लोकसाहित्याचे मराठी साहित्याला योगदान' या कार्यक्रमाचा अहवाल**

मराठी साहित्याचे मूळ लोकसाहित्यामध्ये आहे. मराठी साहित्याची ही भरभराट झालेली दिसते याच्या मुळाशी पोषणतत्व म्हणून लोकसाहित्यच कार्य करते. लोकसाहित्याचे संशोधन किंवा अभ्यास करण्याच्या दृष्टीने पुष्कळ ठिकाणी प्रत्यक्ष जावे लागते. फिरावे लागते. ग्रामीण भागातील लोकांना त्यांच्या संस्कृतीविषयी, त्यांना मुखोद्गत असलेल्या लोकगीताबद्दल, लोककथांबद्दल, लोकसंस्कृतिबद्दल विचारपूस करून त्याचे ध्वनीमुद्रित करून, टंकलिखित करून ते संकलित करावे लागते. हे जिकरीचे कार्य आहे. ते होणे आवश्यक आहे कारण लोकसाहित्य हेच आपली खरी संस्कृती टिकून ठेवण्याचे काम करत असते. असे प्रतिपादन डॉ. रावसाहेब काळे यांनी व्याख्यानाद्वारे केले.

या कार्यक्रमांमध्ये 30 विद्यार्थी 07 प्राध्यापक सहभागी झाले होते

आउटकम्स

विद्यार्थ्यांना लोकसाहित्याची ओळख झाली.

लोकजीवनाची ओळख झाली लोककलांची ओळख झाली.

विद्यार्थ्यांमध्ये साहित्यमूल्य रुजले.

**Report on the program 'Contribution of Folklore to Marathi Literature'**

Marathi literature has its roots in folklore. Folk literature acts as the root of this flourishing of Marathi literature. In order to research or study folklore, one has to go to many places. You have to walk. People in rural areas have to ask questions about their culture, folk songs, folk tales, folk culture and record it, write it down and compile it. This is a work of fortune. It has to be because folklore is what keeps our true culture alive. Such an assertion by Dr. Raosaheb Kale gave a lecture.

30 students 07 professors participated in these programs
outcomes
Students were introduced to folk literature.
Folk life was introduced Folk arts were introduced.
Literary values inculcated in the students.

# Departmental Activity - मराठी विभाग - 2020-21

| Sr.No. | Date | Programme Title | Subject Title & Speaker | Participant Students | Participant Faculty | Outcomes |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 30/8/2021 | व्यावहारिक मराठी<br>Functional Marathi | प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम - प्रमुख पाहुणे - श्री रामभाऊ भटकर- बँक ऑफ बडोदा, अकोला<br>Certificate Distribution Chief Guest - Shri Rambhau Bhatkar Bank of Baroda, Akola | 135 | 09 | प्रमाणपत्र हा प्रशिक्षण वर्ग आयोजित केला होता. या प्रशिक्षण वर्गात द्वारे मराठी भाषेचे व्यावहारिक रूप विद्यार्थ्यांना शिकवले. भाषेचे लेखी आणि व्यावहारिक अशी दोन रूपे असतात याची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये रुजली<br>Certificate Training class was conducted. In this training class, students were taught the practical aspects of Marathi language. Students became aware of the fact that there are two forms of language, written and practical |
| 2 | 2020-21 | प्रकल्प<br>Project | वऱ्हाडी लोकगीते संकलन-संपादन : एम.ए.मराठी भाग 1 व 2 चे विद्यार्थी आणि संस्था.<br>Varhadi Folk Songs Editing: Students of M. A Marathi Part 1 & 2. and Institutions | 15 | 06 | समाज जीवनातील सुख दु:खांचा प्रत्यय लोक गीतांच्या माध्यमातून येतो हा विचार रुजला. वऱ्हाड संस्कृतीचा परिचय विद्यार्थ्यांना झाला.<br>The idea that happiness and sorrow in social life comes through folk songs took root. The students were introduced to the Varhad culture. |

## मराठी विभाग - सत्र 2020-21

**विद्यार्थ्यांची उपलब्धी : परीक्षा उन्हाळी 2020 या परीक्षेमध्ये**

दोन विद्यार्थी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत मेरीट आले

1. मनोज संजय भगत - आठवा मेरीट
2. वैशाली ब्रह्मदेव खांडवे - आठवी मेरिट

Student Achievement: Exam Summer 2020

Two students got merit in the merit list of Sant Gadge Baba Amravati University

1. Manoj Sanjay Bhagat - Eighth Merit
2. Vaishali Brahmadev Khandve - Eighth Merit

**शिक्षकांची उपलब्धी :** **MRP – Subbmit** by Shri Bhaskar Dharne **– 190000-** राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्यातील सण उत्सव विषयक वैज्ञानिक दृष्टिकोन

ग्रंथप्रकाशन - दलित कवितेची निर्मितीप्रक्रिया लेखक डॉ. कैलास वानखडे

डॉ. कैलास वानखडे यांना **पीजी टीचर म्हणून** मान्यता.

डॉ. कैलास वानखडे यांचे **2 शोधनिबंध** प्रकाशित झाले.

डॉ. हरिचंद नरेटी यांनी, घासिदास विश्वविद्यालय बिलासपूर येथे आभासी पद्धतीने शॉर्ट कोर्स पूर्ण केला.

Teacher Achievement:

**MRP – Subbmit** by Shri Bhaskar Dharne **– 190000-**

Rashtrasant Tukdon Ji Maharaj yancha Sahityatil San-Utsav Vishayk vaidnyanik drishtikon

Granth Prakashan - The Process of Dalit Poetry Writer Dr. Kailas Wankhade

Recognized Dr. Kailash Wankhade as PG Teacher by Sant Gadge Baba Amravati University

Dr. Haricha Nareti at Ghasidas University, Bilaspur Completed online short term course.

---

प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम - प्रमुख पाहुणे - श्री रामभाऊ भटकर- बँक ऑफ बडोदा, अकोला




दैनिक जनमाध्यम

• अकोला, मंगळवार ३१ ऑगस्ट २०२१ एक प्रतिष्ठित सवय

# सीताबाई महाविद्यालयात पदविका प्रमाणपत्र वितरण सोहळा

■ शहर प्रतिनिधी । अकोला ■

शहरातील सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अकोला येथे पदविका प्रमाणपत्र वितरण सोहळा सोमवारी पार पडला. दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, माननीय अॅड. मोतीसिंहजी मोहता, बिजीई सोसायटीचे मानद सचिव मा. पवनजी माहेश्वरी, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष बाबूजी तथा रूपचंदजी अग्रवाल, महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य डॉ.आर डी सीकची यांच्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांकरिता एक व्यावहारिक मराठीचा कोर्स घेण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून बडोदा बँकेचे सेवानिवृत्त अधिकारी तथा आपल्या




महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री. रामभाऊ भटकर हे लाभले होते. प्रमुख उपस्थिती म्हणून महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ.अशोक सोनोने व डॉ. प्रसेनजीत गवई हे होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदविका प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे रामभाऊ भटकर यांनी महाविद्यालयाच्या संदर्भात आपल्या जुन्या आठवणीना उजाळा दिला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मराठी विभाग प्रमुख प्रा.भास्कर धारणे यांनी आजच्या घडीला नोकरीच्या संदर्भात प्रमाणपत्र कसे महत्त्वाचे असतात हे विद्यार्थ्यांना पटवून दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कैलास वानखडे यांनी केले.

सूत्रसंचालनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करताना व्यावहारिक मराठी अभ्यासक्रमाचे महत्त्व सांगून आजच्या संदर्भात दैनंदिन जीवनामध्ये आणि व्यवहारात 'व्यावहारिक मराठी'ची उपयोगिता कशी आहे, हे उलगडून दाखवले. या कार्यक्रमाप्रसंगी मराठी विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. हरिचंद्र नरेटी डॉ.सविता रेखे प्रा. उज्वला डांगे आणि पदविका प्रमाणपत्राचे बहुसंख्य विद्यार्थी यांनी उपस्थित राहून या कार्यक्रमाला यशस्वीपणे संपन्न केले.

विशेष उपलब्ध : डॉ.कैलास वानखडे यांचा ग्रंथ "दलित कवितेची निर्मितीप्रक्रिया"
हा 14 फेब्रुवारी 2021 रोजी प्रकाशित झाला.  प्रमुख पाहुणे डॉ. संजय मून  व  डॉ. वासुदेव मुलाटे औरंगाबाद



**क्षेत्रिय कार्य - लोकगीतांचे संकलन प्रकल्प**




## Departmental Activity - मराठी विभाग - सत्र 2021-22

| Sr.No. | Date | Programme Title | Subject Title & Speaker | Participant Students | Participant Faculty | Outcomes |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 31/8/2021 | व्यावहारिक मराठी<br>Functional Marathi | प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम - प्रमुख पाहुणे – डॉ. डी. इ. उंबरकर<br>Certificate Distribution<br>Chief Guest – Dr. D. E Umbarkar | 135 | 09 | मराठी भाषेचे व्यावहारिक रूप विद्यार्थ्यांना शिकवले.<br>भाषेचे लेखी आणि व्यावहारिक अशी दोन रूपे असतात याची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये रुजली.<br>Taught the practical form of Marathi language to the students.<br>Students were made aware that there are two forms of language i.e. written and practical. |
| 2 | 6/1//2022 | Inauguration of Marathi Vadmay Mandal<br>मराठी वाड्मय मंडळाचे उद्घाटन | उद्घाटक - श्री अतिश सोसे संचालक आनंदी गुरुकुल अकॅडमी अकोला<br>Inaugural - Shri aatish sose sanchalak Anandi Gurukul Academy, Akola | 65 | 07 | भाषा संवर्धनाचे कार्य एकत्रितपणे कसे करावे याची मूल्य रुजले.<br>भाषेचे स्वरूप जाणून घेण्याचे कुतूहल विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाले.<br>बोली आणि प्रमाणभाषा यामधील अंतर विद्यार्थ्यांनी समजून घेतले.<br>The value of how to do language conservation work together took root.<br>Curiosity arose among the students to know the nature of the language.<br>Students understood the gap between dialect and standard language. |
| 3 | 27/2/2022 | - मराठी भाषा दिवस<br>( Marathi Language Day) | वक्ते : डॉ. अशोक वाहूरवाघ, मराठी विभागप्रमुख<br>भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश महाविद्यालय पिंजर<br>विषय- मराठी भाषेचे आजचे स्वरूप<br>Speaker Dr. Ashok Wahurwagh, Pinjar, Dit. Akola<br>Subject- Present Form of Marathi Language | 85 | 07 | मराठी भाषेचे ज्ञान अध्ययन झाले.<br>मराठी भाषेचे आजची स्थिती विद्यार्थ्यांना अवगत झाली.<br>भाषेच्या आजच्या स्वरूपाबद्दल विद्यार्थी जागृत झाले.<br>Knowledge of Marathi language was studied.<br>The students were made aware of the current status of Marathi language. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | Students were awakened to the present day nature of the language. |
| 4 | 27/2/2022 | विद्यार्थ्यांचे कवीसंमेलन | अध्यक्ष - भास्कर धारणे मराठी विभाग प्रमुख<br>प्रमुख उपस्थिती : डॉ. अशोक वाहूरवाघ | 51 | 05 | विद्यार्थ्यांनी स्वरचित कविता सादर केल्या.<br>विद्यार्थ्यांच्या काव्यवाचनाला हक्काचा काव्यमंच मिळाला.<br>काव्य लेखनासाठी विद्यार्थ्यांना चालना मिळाली<br>Students presented poems written by them.<br>Poetry reading of students got the right poetry platform.<br>Students were encouraged to write poetry |
| 5 | 16/3/2022<br>MOU | व्याख्यान | वक्ते : डॉ. एकनाथ खेडकर<br>विषय : वऱ्हाडी बोलीचे सौंदर्य | 90 | 06 | वऱ्हाडी भाषेतील सौंदर्य विद्यार्थ्यांना समजले.<br>वऱ्हाडी भाषेचे व्यवहारिक रुप विद्यार्थ्यांना समजले.<br>The students understood the beauty of Vharadi language.<br>The students understood the practical form of Varhadi language. |

## मराठी विभाग - सत्र 2021-22

**मराठी विषयांमध्ये आचार्य पदविकरीता संशोधन केंद्र म्हणून मान्यता**

Recognized Ph.D Research Centre for Marathi

**विद्यार्थ्यांची उपलब्धी : परीक्षा उन्हाळी 2021 या परीक्षेमध्ये**

दोन विद्यार्थी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत मेरीट आले

1. कविता गजानन पांगसे - सातवी मेरिट
2. रानी पांडुरंग विखे - नववी मेरिट

Student Achievement : Exam Summer 2021 in this exam

Two students have merited merit list of Sant Gadgebaba Amravati University

1. Kavita Gajanan Pangse - 7th Merit
2. Rani Pandurang Vikhe - 9th Merit

**शिक्षकांची उपलब्धी :** डॉ. कैलास वानखडे यांचे **दोन शोधनिबंध** प्रकाशित झाले

Dr. Kailas Wankhade published two research papers.

डॉ. कैलास वानखडे लिखीत 'दलित कवितेची निर्मितीप्रक्रिया' या समीक्षाग्रंथाला तीन राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाले.

Teacher Achievement : Award – Dr. Kailas Wankhade's review book 'Making Process of Dalit Poetry' won three state level awards.
(Dalit kavitechi Nirmitiprakriya – Dr. Kailas Wankhade)
Smrutishesh Bhaurav Sardar Sahity Puraskar 2021
Shabdagandh state level Award, ahemadnagar 2021
Shabdangan state level Award, Mukutban 2021

डॉ. हरिचंद नरेटी यांचे **दोन शोधनिबंध** प्रकाशित झाले. Two research papers of Dr. Harichand Nareti were published

### 31/8/2021 सर्टिफिकेट कोर्स प्रमाणपत्राच्या वाटप : प्रमुख पाहुणे - डॉ. दिनकर उंबरकर






**मराठी वाङ्मय  मंडळाचे दि. 6/1/2022 उद्घाटन : उद्घाटक श्री अतिश सोसे,  अध्यक्ष- प्रा भास्कर धारणे**






**डॉ. कैलास वानखडे यांच्या "दलित कवितेची निर्मितीप्रक्रिया" या ग्रंथाला राज्यस्तरीय पुरस्कार 13 फेब्रुवारी 2022**






मातृभूमि

संक्षिप्त

**'दलित कवितेची निर्मिती प्रक्रिया' ग्रंथाला पुरस्कार**



अकोला । शहरातील सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील मराठी विभागाचे प्रा. डॉ. कैलास वानखडे यांच्या 'दलित कवितेची निर्मिती प्रक्रिया' या समिक्षा ग्रंथाला स्मृतीशेष भाऊराव संपतराव सरदार प्रतिष्ठानतर्फे दरवर्षी दिला जाणारा साहित्य क्षेत्रातील मानाचा पुरस्कार 'स्व.भाऊराव सरदार पुरस्कार' जाहीर झाला आहे. पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम परतवाडा येथे संपन्न होणार आहे.

यामध्ये स्मृतीशेष भाऊराव सरदार समीक्षे साठीचा पुरस्कार डॉ.कैलास वानखडे यांच्या 'दलित कवितेची निर्मितीप्रक्रिया' या ग्रंथाला जाहीर करण्यात आला आहे. डॉ. कैलास वानखडे यांनी दलित कवितेची निर्मितीप्रक्रिया शोधण्याचा यशस्वी प्रयत्न केला असुन एका विशिष्ट भूमिकेतून हा प्रयत्न साकार झाला आहे. पाश्चात्यांनी सांगितलेले आणि मराठी साहित्याने स्वीकारलेले निर्मिती प्रक्रियेतील घटकांचे स्वरूप, कार्य, दलित साहित्याच्या संदर्भात कसे बदलते, हे त्यांनी सिद्ध करण्याचा प्रयत्न या ग्रंथाद्वारे केला आहे. दलित कवितेच्या निर्मितीप्रक्रियेचा घेतलेला हा शोध अतिशय महत्त्वपूर्ण आहे. कारण आजवरच्या काळात या स्वरूपाचा अभ्यास कोणीही केलेला नाही, त्यांनी केलेले हे कार्य एकमेव आहे. अशी भावना डॉ. महेंद्र भवरे यांनी ग्रंथाच्या प्रस्तावनेमधून व्यक्त केली आहे.

हा ग्रंथ दलित साहित्याचा अभ्यास करणारे विद्यार्थी, शिक्षक, संशोधक, प्राध्यापक यांना अतिशय उपयुक्त असा ठरणारा ग्रंथ आहे. डॉ. वानखडे यांना पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे सीताबाई महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. डी. सीकची, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष रूपचंदजी अग्रवाल, मराठी विभागप्रमुख प्रा. भास्कर धरणे, प्रा. हरिचंद नेरटी यांच्या सह संपूर्ण शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व शहरातील मित्रमंडळींनी कौतुक केले आहे.

27 फेब्रुवारी 2022, मराठी भाषा गौरव दिन वक्ते - प्रा अशोक वाहूरवाघ



27 फेब्रुवारी 2022,  मराठी भाषा गौरव दिनानिमित्त **कवी संमेलन** अध्यक्ष डॉ. अशोक वाहूरवाघ







**&&&&&&&&&&&&&&&&&&&&&&&&&&&&&&&&&&**

**मराठी विभाग : MOU कार्यक्रम : सत्र 2021-22**

मराठी विभाग, सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला आणि वऱ्हाड शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक बहुउद्देशीय संस्था, लोणी. यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व्याख्यान विषय : वऱ्हाडी बोलीतील सौंदर्य

वक्ता : प्रा. डॉ. एकनाथ खेडकर अध्यक्ष : प्रा. भास्कर धारणे कार्यक्रम दिनांक 15 मार्च 2022 सकाळी 10:00 वाजता

**Department of Marathi : MOU Program : Session 2021-22**

Department of Marathi, Sitabai College of Arts, Commerce and Science, Akola and Varhad Educational, Social and Cultural Multipurpose Institution, Loni. Lecture topic organized in association with: Beauty in Varhadi dialect

Speaker: Prof. Dr. Eknath Khedkar President : Prof. Bhaskar Dharne Program on 15 March 2022 at 10:00 am




**वऱ्हाडी बोलीतील सौंदर्य या कार्यक्रमाचा अहवाल**

वऱ्हाडी बोली ही विदर्भ प्रांतातील पाच जिल्ह्यांमध्ये बोलली जाते. अकोला, वाशिम, बुलढाणा, अमरावती, वर्धा, यवतमाळ या जिल्ह्यामध्ये प्रामुख्याने बोलले जाणारी वऱ्हाडी बोली या प्रदेशाच्या संस्कृतीची ओळख आहे. डॉ. एकनाथ खेडकर यांनी वऱ्हाडी बोलीतील म्हणी वाक्प्रचार लोकगीतांच्या माध्यमातून वऱ्हाडीचे सौंदर्य उलगडून दाखवले माणसाची जगण्याची पद्धती, वागण्याची संस्कृती, कपडे, जेवण, संस्कार, लग्न समारंभ इत्यादी संस्कारातून संस्कृतीचे वहन भाषेद्वारा केले जात असते. माणसाच्या जडणघडणीमध्ये भाषेचा आणि संस्कृतीचा फार महत्त्वाचा वाटा असतो. कोणतेही नवीन ज्ञान आत्मसात करण्यासाठी बोलीभाषा हीच महत्त्वाची भूमिका करत असते. आत्मसात केलेले ज्ञान अभिव्यक्त करण्यासाठी आपण कोणती भाषा वापरतो हे फार महत्त्वाचे नसते. ज्ञान आत्मसात करणे ही महत्वाची बाब आहे, ते करण्यासाठी लोकभाषा हीच उपयोगात पडते. असे प्रतिपादन डॉ. एकनाथ खेडकर यांनी केले.

या कार्यक्रमांमध्ये 30 विद्यार्थी 07 प्राध्यापक सहभागी झाले होते

आऊटकम्स

वऱ्हाडी लोकभाषेविषयी विद्यार्थ्यांना ज्ञान मिळाले.

वऱ्हाडी भाषेची जनजागृती झाली.

लोकभाषेतून संशोधन करण्याची प्रेरणा विद्यार्थ्यांना मिळाली.

**A report on the program Beauty in Vharadi dialect**

Varhadi dialect is spoken in five districts of Vidarbha province. Varhadi dialect spoken mainly in the districts of Akola, Washim, Buldhana, Amravati, Wardha, Yavatmal is the identity of the culture of the region. Dr. Eknath Khedkar has revealed the beauty of the bridegroom through the proverbs, phrases and folk songs of Varhadi dialect. Culture is carried through language through the rituals of people's way of life, behavior, clothes, food, rituals, wedding ceremonies etc. Language and culture play a very important role in the formation of man. Language plays an important role in acquiring any new knowledge. It is not very important what language we use to express the acquired knowledge. Acquiring knowledge is important, and for that, vernacular is used. Such an assertion by Dr. Done by Eknath Khedkar.

30 students 07 professors participated in these programs

Outcomes

Students got knowledge about Varhadi folk language.

Public awareness of Varhadi language was created.

Students got inspiration to do research from vernacular.